Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

UGC Approved Monthly Journal

VOL-IV ISSUE-VIII Aug. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**
UGC Approved Sr.No.64259
Vol - IV Issue-VIII AUGUST 2017 ISSN 2349-638x Impact Factor 3.025

# मूल्य शिक्षण

**प्रा.डॉ.मस्के विशाखा पांडुरंग**
श्री.शा.भ.शि.संस्थेचे
अध्यापक महाविद्यालय, नांदेड.

**राथस, हरमिन व सायमन :**

Out experiences may come certain general guides to behavious. These guides tend to give direction to life and may be called Values.

अनुभवातून वर्तनाबाबत सर्वसामान्य मार्गदर्शक तत्त्वे प्राप्त होऊ शकतात. ही मार्गदर्शक तत्त्वे जीवनाला दिशा दाखवू शकतात व त्यांनाच मूल्ये असे म्हणता येईल.

NCERT ची व्याख्या जीची आकांक्षा धरावी वा पाठपुरावा करावा अशी गोष्ट म्हणजे मूल्य होय.मूल्य म्हणजे नैतिक मूल्ये, चारित्र्य घडणीसाठी इष्ट वर्तन तत्त्व असा अर्थ घेणे आवश्यक आहे. Values can't be taught but they are to be caught.

**हेन्री ज्यूल्स :**

Values are something that we consider good such as love, kindness, contentment, fun, honesty, decency, relazation, simplicity.

मूल्ये म्हणजे ज्याला आपण चांगले समजतो असे काहीतरी. उदाहरणार्थ प्रेम, दयाळूपणा, समाधान, गंमत, प्रामाणिकपणा, सभ्यता व साधेपणा.

**प्रा.किरीट जोशी :**

The world value as understood in the context of educational philosophy, refers to those desirable ideals ideals and goals which, are intrinscic in themselves and which, when achieved or attempted to be achieved, evoke a deep sense of fulfillment to one or many or all parts of what we consider to be the highest element of our nature.

शैक्षणिक तत्त्वज्ञानाच्या संदर्भात मूल्ये म्हणजे स्वत:च्या असण्यानेच महत्त्व प्राप्त झालेले वांच्छित आदर्श व ध्येये होत. हे आदर्श वा ध्येये प्राप्त केल्यानंतर, एखाद्या व्यक्तीत वा सर्वात किंवा ज्याला आपण आपल्या स्वभावाचा अत्युच्च घटक समजतो अशा घटकाच्या सर्व भागात पूर्णतेची खोलवर भावना जागृत होते.

**मूल्याची लक्षणे वा स्वरूप (Character) :**

१) मूल्य म्हणजे पसंती. ही पसंती एखादे तत्त्व, वस्तू वा अन्य बाबतीतही असू शकेल.
२) मूल्य व्यक्तिगत वा वस्तूगत असू शकते.
३) मूल्यांचा विकास व्यक्तिगत अनुभव वा अभिसंधानाने होतो.
४) मूल्यांमुळे वर्तनाला दिशा मिळते.
५) मूल्याधिष्ठित वर्णन वावर्तन व्यक्तीच्या वा समाजाच्या अंतिम कल्याणाच्या दृष्टीने चांगले असते.
६) मूल्यांचा संबंध मानवातील उच्च अंशांशी असतो.
७) मूल्ये जीवनाच्या विविध अंगांसाठी - अर्थव्यवस्था, राजनीती, धर्म, संस्कृती इत्यादी निकष पुरवितात.
८) मूल्याधिष्ठित वर्तन वांच्छनीय व नैतिक असते.
९) मूल्यांचा संबंध नीतिमत्तेशी असतो.
१०) मूल्यांमुळे मनुष्याच्या वर्तनाला तात्त्विक आधार मिळतो.

**मूल्यांचे प्रकार :**मूल्यांचे प्रकार अनेक रीतींनी करता येतात.

एन.सी.इ.टी.ने Documents on Socialm, Moral Spiritual Values in Education या पुस्तिकेत ८३ मूल्यांची यादी दिली आहे. त्यातील काही मूल्ये पुढे दिली आहेत.

(१) इतरांच्या सांस्कृतिक मूल्यांची जाण (२) अस्पृश्यता न मानणे (३) नागरिकत्त्वाचे पालन (४) सहकार्य (५) स्वच्छता (६) लोकशाहीवर विश्वास (७) व्यक्ती-सम्मान (८) कर्तव्यपरायणता (९) शिस्त (१०) सहनशीलता (११) प्रामाणिकपणा (१२) शिष्टाचार (१३) कृतज्ञता (१४) प्रामाणिकपणा (१५) पशुप्रेम (१६) अहिंसा (१७) शांतिप्रियता (१८) देशप्रेम (१९) साधी राहणी (२०) आत्मनिर्भरता (२१) स्व-नियंत्रण (२२) सत्यप्रियता (२३) समाजसेवा (२४) समाजवाद (२५) नियमितता इत्यादी.

**मूल्यशिक्षणाची आवश्यकता :** मूल्यशिक्षण देणे वा प्राप्त करणे खालील कारणांमुळे आवश्यक आहे.

१) व्यक्तित्त्वाचा संपूर्ण विकास असे शिक्षणाचे उद्दिष्ट सांगितले जाते.मूल्याधिष्ठित वर्तन व्यक्तिमत्त्वाचे प्रमुख अंग आहे. त्यासाठी मूल्यशिक्षण आवश्यक आहे.
२) मूल्यांमुळे वर्तनाला विशिष्ट दिशा लाभते, वर्तनाला तात्त्विक बैठक लाभते.
३) मूल्यांमुळे मानसिक संघर्ष कमी होतो.
४) मूल्यांमुळे व्यक्तीत निर्णयक्षमता येते.
५) मूल्यांमुळे सत्य, सहकार्य, प्रेम, शांती इत्यादी मूलभूत गुणांचा विकास होतो.
६) सामाजिक मूल्यांचा-लोकशाही, बंधुता, सर्वसमभाव, समानता इ. शिक्षणाच्या मदतीने जबाबदार नागरिक बनविता येतात.
७) मूल्यशिक्षण सुसंस्कृतता अंगी बाणविण्यासाठी आवश्यक आहे.
८) मूल्यशिक्षणामुळे सुसंस्कृतता अंगी बाणविण्यासाठी आवश्यक आहे.
९) मूल्यशिक्षणामुळे स्वत:विषयी व एकूण जीवनाच्या सर्व अंगांविषयी योग्य अभिवृत्ती निर्माण होण्यास मदत मिळते.
१०) मूल्यांमुळे सामाजिक स्वास्थ्य निर्माण होते. सामाजिक व्यवहारात विश्वासाची भावना निर्माण होते. सहकार्य, प्रेम, ऋजुता या मूल्यांमुळे सामाजिक संघर्ष कमी होण्यास मदत होते. मूल्यांमुळे सामाजिक विकासास हातभार लागतो.

मूल्य शिक्षण हा शाळांत वेगळा विषय न ठेवता तो संपूर्ण अभ्यासक्रमाचा अविभाज्य भाग झाला पाहिजे. प्रत्येक विषय शिकविताना मूल्याशी संबंधित अनुभव विद्यार्थ्यांना द्यावा.

उदाहरणार्थ, भूगोल शिकविताना आंतरराष्ट्रीय सहकार्याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष वेधणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या विविध स्तरांवर योग्य अध्ययन-अध्यापन पध्दतीचा उपयोग करावा. उदाहरणार्थ चर्चा-पध्दती, कथाकथन, नाट्य, चरित्र वाचन, व्याख्याने इत्यादी अभ्यासानुवर्ती कार्यक्रमांचा उपयोगही या दृष्टीने करून घ्यावा. परंतु या सर्वांपेक्षा महत्त्वाचे स्थान म्हणजे शिक्षकांचे आदर्श वर्तन. शिक्षकांची आदर्श वर्तनामुळे अप्रत्यक्ष पण प्रभावीरित्या विद्यार्थ्यांना मूल्यांचे शिक्षण मिळते.

**संदर्भग्रंथ सूची :**

१) कुंडले म.बा., शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, श्रीविद्या प्रकाशन, पुणे. ३०, १९९६.
२) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३०, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - १९८६, शैक्षणिक आव्हानाकडून कृती कार्यक्रमाकडे, १९८७.
३) अरविंद टुनाळे, प्रगत शैक्षणिक तत्त्वज्ञान : नित्यनूतन प्रकाशन.